**प्रेसनोट दिनांक ०७/०४/२०१९**

**विमानतळ पोलीस स्टेशन पुणे**

**महागडया गाडीतुन विदेशी दारु घेवुन जाणारे इसमांस विमानतळ पोलीसांनी अटक करुन उत्कृष्ठ कामगिरी केलेबाबत.......**

दिनांक २७/०३/२०१९ रोजी गिरीश बिंदुमाधव कट्टी वय ५२ वर्षे (सहा.राज्यकर आयुक्त जीएसटी) रा. हडपसर पुणे हे त्यांचे एस.एस.टी टीम मधील सहकारी सहा पोलीस फौजदार जोशी, पोलीस हवा. २४४८ गायकवाड, पोलीस शिपाई ७६१४ सैय्यद आणि फ्रोटोग्राफर अजय मल्हारी काळे यांचे सोबत निवडणुक आयोगाने दिलेल्या सुचनां प्रमाणे विमानतळ पोलीस स्टेशनचे कार्यक्षेत्रामध्ये न्यु एअरपोर्ट रोडवरील सिंम्बॉयसियस लॉ कॉलेज चौकामध्ये वाहनामधुन कोणी इसम काही भे्ट वस्तु, शस्त्रे, चलनी नोटा,मदय व अन्य काही चिज वस्तु वाटपासाठी घेवुन जात असल्यास त्याचे कारवाई करणेसाठी सायंकाळी १८/०० वा. ते २०/०० वा.चे दरम्यान वाहन चेकींग करीत असताना सायं. १९/३० वाजता बीएमडब्ल्यु कार नंबर एम एच १२/एम ई ६६३३ ही थांबवुन चेकींग करीत असतांना सदरचे कारचे डिक्की मधील बॅगमध्ये ठेवलेल्या विदेशी कंपनीच्या (महागडया दारुचा बाटल्या) प्रोव्हीबिशन माल त्यांना मिळुन आलेने त्यांनी सदरचा कार चालक नामे साहील राजेश पंजाबी वय २२ वर्षे मुळ रा. हिरा सोसायटी, ९६५/६६,सी-५, एरविन रोड, नाना पेठ कॅम्प पुणे सध्या राहणार मेंपल लिव्हस बंगला नं.०१,कुरीएंथन क्लब समोर उंड्री रोड, मोहंमदवाडी पुणे यास त्याचे कारमधील प्रोव्हिबिशनचे मालासह विमानतळ पोलीस स्टेशन पुण् येथे पोलीस उपनिरीक्षक डी.जे.जाधव,पोलीस नाईक ६६६५ गायकवाड यांचेकडे हजर केले असता त्यांनी गिरीश बिंदुमाधव कट्टी वय ५२ वर्षे (सहा.राज्यकर आयुक्त जीएसटी) रा. हडपसर पुणे यांची महाराष्ट दारुबंदी कायदा कलम ६५ ई ची फिर्याद घेवुन आरोपी साहील राजेश पंजाबी वय २२ वर्षे याचे विरुध्द गुन्हा दाखल करुन त्यांचेकडुन एकुण २२९००/- चा प्रोव्हिबिशनचा माल जप्त करुन त्याला दाखल गुन्हयात अटक करुन उत्कृष्ठ कामगिरी केलेली आहे.

**(राजेंद्र पाटील)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर.